**महाराष्ट्र शासन**

**उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अकोट वन्यजीव विभाग, अकोट यांचे कार्यालय.**

**कार्यालय :- पोपटखेड रोड आकोट,जि. अकोला,पिन को.नं. 444101 ई-मेल** -dcf.akot@yahoo.com ;dycfwlakot@mahaforest.gov.in

**निसर्ग पर्यटन व सांस्कृतीक महोत्सव दि.30 जानेवारी 2026 ते 01 फेब्रुवारी 2026 या कालावधीत नरनाळा महोत्सव, 2025-26 आयोजीत करण्यात येत आहे. करिता, प्रस्तावीत पर्यटन महोत्सवासाठी स्वयंसेवकांची आवश्यकता असून, आयोजीत पर्यटन महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी इच्छुक व पात्र स्वयंसेवकांची खाली नमुद पार्टलवर अर्ज मागविण्यात येत आहेत.**

1) संपर्क अधिकारी :- श्री.ए.एम. तराळे, मुख्यलेखापाल, आकोट वन्यजीव विभाग, आकोट भ्र.क्र.-9960846080.
पोर्टल सबंधीत माहिती संदर्भात :- ई मेल-admin@narnalafest.in भ्र.क्र.7840935372.
2) किमान पात्रता :- किमान 10 वी पास, वनविभागात काम करण्याचा पूर्वीचा अनुभव असलेले किंवा स्थानिक उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.
3) कार्यक्रमाचे वेळापत्रक :- दि.30 जानेवारी 2026 ते 01 फेब्रुवारी 2026.
4) नोंदणी :- narnalafest.in या पोर्टलवर ऑनलाईन दिनांक 23/01/2026 रोजी सकाळी 10.00 वा. ते दि.26/01/2026 रोजी सायं.17.00 वाजेपर्यत किंवा दि.26/01/2026 पर्यंत उपवनसंरक्षक, आकोट वन्यजीव विभाग, आकोट यांचे कार्यालय पत्ता-पोपटखेड रोड, आकोट ता.आकोट येथे Resume (नाव, पत्ता, ईमेल, मोबाईल नंबर,शैक्षणिक अहर्ता, ईच्छुक कामाचे स्वरुप नमुद करणे, ई.) स्वहस्ते जमा करणे आवश्यक आहे. या कार्यालया मार्फत दि.27/01/2026 रोजी ईमेल किंवा भ्रमणध्वनी व्दारे पात्र उमेदवारांना कळविण्यात येईल व त्यांनी दि.28/01/2026 रोजी ओळखपत्र (आधार, ई.), कलर छायाचित्र ई. सोबत आणावे; जेणेकरुन, निवड झालेल्या स्वयंसेवकांना ओळखपत्र देवून, कार्यपालनाबाबत आवश्यक सुचना निर्गमीत करण्यात येतील.
5) कामाचे स्वरुप :- पर्यटकोना मार्गदर्शन व माहिती देणे, नोंदणी व स्वागत व्यवस्था, स्वच्छता व शिस्त राखणे, महोत्सव कार्यक्रमा दरम्यान सहाय्यक करणे, आपत्कालीन परिस्थितीत मदत करणे, अधिकारी/कर्मचारी यांचे सुचनेचे पालन करणे.
6) कामाचे ठिकाण :- आकोट, ता.आकोट, जि.अकोला.

**अटी व शर्ती :-**

1) सर्व पात्र ईच्छुक उमेदवारांनी सदरहु प्रक्रियेत भाग घेण्यासाठी narnalafest.in या संकेतस्थळावर भेट देवून, स्वत: नोंदणी करुन ऑनलाईन नोंदणी करणे किंवा स्वहस्ते Resume सादर करणे आवश्यक आहे.
2) नोंदणी करणारे उमेदवारा यांना अटी व शर्ती मान्य असल्याचे समजण्यात येईल. त्या-नुसार नमुद अटी व शर्तीचे पालन करण्याची जबाबदारी अर्जदार यांची राहील.
3) अटी व शर्तीनुसार मागविण्यात आलेली साक्षांकीत कागदपत्रे दिलेल्या वेळापत्रकात नमुद केलेल्या वेळेत सादर करावे. अन्यथा सदरहु प्रक्रियेत त्यांना सहभागी होता येणार नाही याची त्यांनी नोंद घ्यावी.
4) वरिल सुचना वनविभागाच्या www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
5) या दरम्यान कोणतीही जिवित/वित्त हानी झाल्यास त्यास वन विभाग जबाबदार राहणार नाही. तसेच कामा दरम्यान कोणतेही शासकिय मालमत्तेचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
6) वन व वन्यजीव विषयक कायद्याच्या व ईतर लागू असलेले नियमांचे पालन करण्याची जबाबदारी संबधीत स्वयंमसेवकांची राहील.
7) हि नोटीस सार्वजनिक हिताच्या दृष्टीने निर्गमीत करण्यात येत असून, वरील अटी व शर्तीमध्ये बदल करण्यांचा किंवा कोणतेही कारण न दर्शविता एखादी बाब किंवा काम रदद करण्याचा अधिकार संचालन समितीने राखुन ठेवला आहे.

**राहुल सिंह टोलिया (भा.व.से.)**
**उपवनसंरक्षक,**
**मेळघाट व्याघ्र प्रकल्प,**
**आकोट वन्यजीव विभाग, आकोट**